पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २२**
**सभावृत्तांत**

दिनांक : **०७/०९/२०१६** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची पाक्षिक सभा बुधवार दिनांक **०७/०९/२०१६** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.जावेद रमजान शेख
३. मा.ननवरे जितेंद्र बाबा
४. मा.तानाजी विठ्ठल खाडे
५. मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
६. मा.बो-हाडे अरुण तुकाराम

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.पानसरे – क्रीडा अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

**उपस्थित सन्मा.सदस्यांचे संमतीने खालील ऐनवेळचे विषय सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आले.**

विषय क्र.१) ओपन जिमचे साहित्य खरेदी करणेबाबत –

विषय क्र.२) महापौर चषक जिल्हास्तर बुध्दीबळ स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव.

विषय क्र.३) भोसरी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता, साफसफाई देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाचे आदेश निर्गत करणेबाबत.

विषय क्र.४) पॅराऑलिंम्पिक स्विमिंग असोशिएशनच्या खेळाडूंचा खेळाडू दत्तक योजनेत समावेश करणेबाबत –

विषय क्र.५) विठ्ठल शरणप्पा कट्टीमणी यांची मैदान कर्मचारी (ग्राऊंडसमन) पदावर नियुक्ती करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव.

विषय क्र.६) खेळाडू दत्तक योजनेत लॉन टेनिस खेळाडूंचा समावेश करणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव.

विषय क्र.७) प्रोत्साहनपर अनुदान देणेबाबत – मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव.

विषय क्र.८) रायफल शुटींग प्रशिक्षण केंद्राकरीता हॉल पी.पी.पी.तत्वावर ११ महिने कराराने चालविण्यास देणेबाबत – मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव.

----------

**खालीलप्रमाणे सुचना मांडणेत आली.**

सुचक – मा.तानाजी खाडे अनुमोदक – मा.जावेद शेख

मा.कामगार नेते शरद राव व पुणे मनपाच्या नगरसदस्या राजश्रीताई आंदेकर यांचे दु:खद निधन झालेने त्यांना श्रध्दांजली वाहून पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दि.०७/०९/२०१६ ची पाक्षिक सभा सोमवार दि.१२/०९/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत तहकूब करणेत यावी.

सदर सुचना सर्वानुमते मान्य झाली.

----------

**सभापती -** सोमवार दि.१२/०९/२०१६ रोजी दुपारी २.०० वाजेपर्यंत सभा तहकूब करणेत येत आहे.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८.
मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
**कार्यपत्रिका क्रमांक – २२**
**सभावृत्तांत**
**(** दिनांक ०७/०९/२०१६ ची तहकूब सभा **)**

दिनांक : **१२/०९/२०१६** वेळ : दुपारी **२.००** वा.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा. क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीची दि.०७/०९/२०१६ ची तहकूब सभा सोमवार दिनांक **१२/०९/२०१६** रोजी दुपारी **२.००** वा. महानगरपालिकेच्या प्रशासकीय इमारतीमधील महापौर मधुकरराव रामचंद्र पवळे सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेत खालील सन्मा.सदस्य उपस्थित होते.

**१. मा.मासुळकर समीर मोरेश्वर - सभापती**
२. मा.तानाजी विठ्ठल खाडे
३. मा.अँड.नितीन ज्ञानेश्वर लांडगे
४. मा.बो-हाडे अरुण तुकाराम
५. मा.पवार संगीता शाम

या शिवाय मा.कडूसकर – सहा.आयुक्त, मा.उल्हास जगताप – नगरसचिव, मा.माछरे – सहा.आयुक्त, मा.कांबळे – शिक्षणाधिकारी (माध्यमिक), मा.मुंढे – सहा.प्रशासन अधिकारी (शिक्षण मंडळ), मा.पानसरे – क्रीडा अधिकारी, हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

----------

अ) दिनांक **०३/०८/२०१६, व १८/०८/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक २० )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

ब) दिनांक **१८/०८/२०१६** रोजी झालेल्या सभेचा **( कार्यपत्रिका क्रमांक २१ )** सभावृत्तांत कायम करणेत आल्याचे मा.सभापती यांनी प्रकट केले.

----------

**सभा कामकाजामध्ये दाखल करुन घेणेत आलेले ऐनवेळचे विषय घेणेत आले.**

ठराव क्रमांक – ७७ विषय क्रमांक – ०१
दिनांक - १२/०९/२०१६ विभाग - क्रीडा
सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.संगीता पवार
संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/०३/कावि/१५५/२०१६, दि.०७/०९/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन -

मनपाच्या ०५ सन्मा.नगरसदस्य/नगरसदस्या यांनी प्रस्तावात नमुद ठिकाणी ओपन जिम तयार करणेकरिता साहित्य खरेदी करणेसाठी व त्याकामी येणा-या अंदाजे

र.रु.१३,०८,०००/- इतका खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व ओपन जिम साहित्याची खरेदी मनपाचे मध्यवर्ती भांडार विभागाकडून ई-निविदा नोटीस प्रसिध्द करुन कार्यवाही करणेस तसेच सेक्टर क्र.२२ कै.मधुकर पवळे विद्यालय वॉर्डातील उद्यानामध्ये व मैदानात ओपन जिमचे साहित्य खरेदी करणेस तसेच मासुळकर कॉलनीमधील हेगडेवार मैदान व अण्णासाहेब मगर स्टेडियम येथे ओपन जीम साहित्य खरेदी करणेस तसेच पवळे शाळा क्र.२/१ मैदानामध्ये ओपन जिम साहित्य खरेदी करुन बसविणेस व त्याकामी येणा-या खर्चास प्रशासकीय मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७८ विषय क्रमांक – ०२

दिनांक - १२/०९/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव -

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्यावतीने व पुणे डिस्ट्रीक्ट चेस सर्कल यांचे मान्यतेने पिंपरी चिंचवड महानगरपालिका चेस असोशिएशन, चिंचवड, पुणे ३३ यांचे सहकार्याने माहे नोव्हेंबर २०१६ मध्ये म.न.पा.चे संत ज्ञानेश्वर क्रीडा संकुल, इंद्रायणीनगर, भोसरी, पुणे २६ येथे महापौर चषक जिल्हास्तर बुध्दीबळ स्पर्धा २०१६-१७ आयोजित करणेस व त्याकामी येणा-या र.रु.२,९२,२००/- चे खर्चास अथवा प्रत्यक्ष येणा-या खर्चास मान्यता व ट्रॉफीज, मेडल्स, सन्मानचिन्हे, पी.व्ही.सी.फ्लेक्स, बॅनर्स, इ.खरेदी कोटेशन नोटीस प्रसिध्द करुन करणेस, व सदर खर्चातील स्टेज, मंडप, टेबल-खुर्च्या, मॅट/चटई व्यवस्था टेबल १०० नग, खुर्च्या ४०० नगर करीता र.रु.५०,०००/- हा खर्च स्थापत्य विभाग ई क्षेत्रीय कार्यालय, व विद्युत स्पिकर व जनरेटर व्यवस्थेकरीता र.रु.५०,०००/- हा खर्च विद्युत विभाग ई क्षेत्रीय कार्यालय यांचेकडून खर्ची टाकणेस व उर्वरित र.रु.१,९२,२००/- हा खर्च महापौर चषक विविध क्रीडा स्पर्धा या लेखाशिर्षातून खर्ची टाकणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ७९ विषय क्रमांक – ०३

दिनांक - १२/०९/२०१६ विभाग - क्रीडा

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७अ/कावि/५४०/२०१६, दि.०६/०९/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

अल्पमुदतीची ई निविदा नोटीस क्र.२/२०१५-१६ भोसरी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता साफसफाई, देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामकाजासाठी प्राप्त झालेल्या दरानुसार मे.सुमीत स्पोर्टस् अन्ड फिटनेस इक्विपमेंट चिंचवड यांना भोसरी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता साफसफाई, देखभाल व यांत्रिक देखभाल

दुरुस्ती कामकाज देणेकामी पहिल्या वर्षात दरमहा र.रु.१,२२,५००/- प्रमाणे १२ महिन्यांकरीता र.रु.१४,७०,०००/- इतका व दुस-या वर्षात दरमहा र.रु.१,३४,७५०/- प्रमाणे १२ महिन्यांकरीता र.रु.१६,१७,०००/- इतका असा एकूण र.रु.३०,८७,०००/- चे दर स्विकृत करुन सदर ठेकेदाराकडून करारनामा करुन २ वर्षाचे कामाचे आदेश निर्गत करणेकामी तसेच भोसरी जलतरण तलाव पाणी शुध्दीकरण, परिसर स्वच्छता साफसफाई, देखभाल व यांत्रिक देखभाल दुरुस्ती कामाचे निविदेमध्ये येथून पुढे शासकीय व निमशासकीय संस्थेत काम केल्याचा अनुभव असावा ही अट रद्द करुन निविदा प्रसिध्दीस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८० विषय क्रमांक – ०४

दिनांक - १२/०९/२०१६ विभाग - क्रीडा

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.संगीता पवार

संदर्भ : मा.महापालिका आयुक्त यांचे पत्र क्र.क्रीडा/७/कावि/२०३/२०१६, दि.०७/०९/२०१६

मा.महापालिका आयुक्त यांची शिफारस विचारात घेऊन –

इंडियन ऑलिंम्पिक असोशिएनशची मान्यता, संलग्नता प्राप्त असलेल्या राष्ट्रीय अपंग फेडरेशनद्वारे आयोजित अधिकृत स्पर्धा, तसेच महाराष्ट्र ऑलिंम्पिक असोशिएनशची मान्यता, संलग्नता प्राप्त असलेल्या महाराष्ट्र राज्य अपंग असोशिएशनद्वारे आयोजित राज्यस्तर, राष्ट्रीयस्तर स्पर्धेत तसेच पॅराऑलिंम्पिक स्विमिंग असोशिएशनद्वारे आयोजित राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्पर्धेत सहभागी खेळाडूंना खेळाडू दत्तक योजनेत समावेश करणेस तसेच खेळाडू दत्तक योजना या मध्ये अट क्र.१९ मध्ये एका खेळाडूस एका आर्थिक वर्षात क्रीडा शिष्यवृत्ती व क्रीडा प्रबोधिनीचा लाभ घेता येईल. क्रीडा प्रबोधिनीचे खेळाडूस दत्तक योजनेचा लाभ घेता येणार नाही अथवा खेळाडू दत्तक योजनेच्या खेळाडूस क्रीडा प्रबोधिनीचा लाभ घेता येणार नाही परंतु क्रीडा शिष्यवृत्तीचा लाभ घेता येईल अशा दुरुस्तीसह मान्यतेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८१ विषय क्रमांक – ०५

दिनांक - १२/०९/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव –

क्रीडा प्रबोधिनी प्रशालेत मैदान कर्मचारी (ग्राऊंडसमन) पद रिक्त असुन त्या पदावर विठ्ठल शरणप्पा कट्टीमणी यांची मैदान कर्मचारी (ग्राऊंडसमन) पदावर नियुक्ती करणेत यावी. विठ्ठल शरणप्पा कट्टीमणी यांनी २०१४ साली पुणे विद्यापिठ मधून बी.ए.पदवी घेतली असून २००४ ते २०१० पर्यंत ५ सुवर्ण पदके कब्बड्डी या खेळामध्ये मिळविली आहेत. तसेच त्यांना इतर खेळाचेही विशेष ज्ञान असून रामचंद्र गायकवाड विद्यालयाचा एक वर्षाचा मैदान

कर्मचारी पदाचा अनुभव आहे. तरी विठ्ठल शरणप्पा कट्टीमणी यांची मैदान कर्मचारी (ग्राऊंडसमन) पदावर सहा महिने कालावधीसाठी दरमहा र.रु.१०,०००/- (अक्षरी र.रु.दहा हजार फक्त) मानधनावर नियुक्ती करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समिती सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८२ विषय क्रमांक – ०६

दिनांक - १२/०९/२०१६

सुचक : मा.तानाजी खाडे अनुमोदक : मा.अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.जावेद शेख यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड महानगरपालिका क्रीडा विभागामार्फत दरवर्षी खेळाडू दत्तक योजना राबविली जाते. या योजने अंतर्गत दरवर्षी लॉन टेनिस खेळाडूंना लाभ दिला जात होता. परंतु यावर्षीपासून मनपाच्या खेळाडू दत्तक योजनेमधून लॉन टेनिस खेळाडूंना वगळण्यात आले आहे. तरी दरवर्षी प्रमाणे खेळाडू दत्तक योजनेत लॉन टेनिस खेळाडूंचाही समावेश करणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी समितीमार्फत मा.महापालिका सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८३ विषय क्रमांक – ०७

दिनांक - १२/०९/२०१६

सुचक : मा.अरुण बो-हाडे अनुमोदक : मा.तानाजी खाडे

संदर्भ : मा.अरुण बो-हाडे, मा.तानाजी खाडे यांचा प्रस्ताव –

पिंपरी चिंचवड शहरातील नवोदित साहित्यिकांच्या कथासंग्रह, कादंबरी व काव्यसंग्रहाच्या पहिल्या पुस्तकासाठी प्रोत्साहन म्हणून प्रत्येकी किमान १० हजार आणि अधिकाधिक र.रु.२५ हजार रुपयांचे अनुदान देण्यात यावे. प्रतिवर्षी तीन लाख रुपयांपर्यंत यासाठी मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समितीच्या खर्चामध्ये तरतूद करणेस मान्यता देणेत येत आहे.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

ठराव क्रमांक – ८४ विषय क्रमांक – ०८

दिनांक - १२/०९/२०१६

सुचक : मा. तानाजी खाडे अनुमोदक : मा. अरुण बो-हाडे

संदर्भ : मा.तानाजी खाडे, मा.अरुण बो-हाडे यांचा प्रस्ताव –

प्रभाग क्र.४५ पिंपरी वाघेरे येथे नव्याने बांधण्यात आलेल्या जलतरण तलाव इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील एक मोठा हॉल उपलब्ध आहे. सदर हॉलची डेक्कन पिस्तुल अन्ड रायफल क्लब, वंशज सोसायटी, मुंढवा रोड, पिंगळेवस्ती, पुणे – ४११ ०३६ यांनी समक्ष पाहणी केली असून सदर हॉलमध्ये रायफल शुटींग प्रशिक्षण केंद्र सुरु करण्यास तयार

आहेत. रायफल शुटींग केंद्राकरिता आवश्यक स्ट्रक्चर उभारणी, साहित्य, रायफल्स, पिस्तुल व टार्गेट इ. डेक्कन पिस्तुल अन्ड रायफल क्लब, पुणे – ४११ ०३६ ही संस्था स्वखर्चाने करण्यास तयार आहे. तरी पिंपरी वाघेरे येथे नव्याने बांधण्यात आलेल्या जलतरण तलाव इमारतीमध्ये पहिल्या मजल्यावरील हॉल रायफल शुटींग प्रशिक्षण केंद्राकरिता पै.अमित वाघेरे शुटींग रेंज यांच्या अंतर्गत डेक्कन पिस्तुल अन्ड रायफल क्लब, पुणे – ४११ ०३६ या संस्थेस पी.पी.पी. तत्वावर ११ महिने कराराने चालविणेस देणेस मान्यता देणेकामी मा.स्थायी सभेकडे शिफारस करणेत येत आहे. सभावृत्तांत कायम होणेची वाट न पाहता ठराव मा.स्थायी समिती सभेकडे पाठविणेत यावा.

सदर ठराव सर्वानुमते मान्य झाला.

----------

यानंतर मा.सभापती यांनी सभा संपल्याचे जाहिर केले.

( **मासुळकर समीर मोरेश्वर** )
**सभापती**
मा.क्रीडा, कला, साहित्य व सांस्कृतिक समिती
पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - १८.

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८. नगरसचिव कार्यालय
क्रमांक : नस/४/कावि/४८०/२०१६
दिनांक : १२/०९/२०१६ चे लगत.



**नगरसचिव**
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - ४११ ०१८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांचेकड पुढील योग्य त्या
कार्यवाहीसाठी रवाना.